# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) अन्वये झालेली तक्रार

## तक्रार क्रमांक : १८८४/२०२१

**तक्रारकर्ता, श्री.हबीब अब्दुल रहीम मोमीन**
१५० कोटरगेट, लंबी चाल, भिवंडी,
ता.भिवंडी, जि.ठाणे.

विरुध्द

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहा.आयुक्त, प्रभाग समिती क्र.५, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, जुना एस.टी.स्टॅण्ड, कापआळी, ता.भिंवडी, जि.ठाणे ४२१ ३०२.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहा.आयुक्त, प्रभाग समिती क्र.५, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, जुना एस.टी.स्टॅण्ड, कापआळी, ता.भिंवडी, जि.ठाणे ४२१ ३०२.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : ०२.०४.२०२५**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज प्राप्त दिनांक | प्रथम अपिल आदेश प्राप्त दिनांक |
|---|---|---|---|
| २६.०८.२०२१ | -- | ०१.१०.२०२१ | -- |

तक्रारकर्ता यांनी दि. १०.१२.२०२१ रोजीच्या अर्जान्वये *" माहिती अधिकार अर्जात उल्लेखलेली माहिती न दिल्याने "*असे कारण नमूद करुन कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जावर आज दिनांक ०२.०४.२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता ऑनलाईन उपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी श्री.बाळाराम के.जाधव, सहाय्यक आयुक्त, प्रभाग समिती क्र.५, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका उपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

*" मौजे भिवंडी येथील सि.स.नं.५६९/६, ५६९/१०, ५६९/११ आणि ५७० या शासकीय भुखंड महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी यांच्या संगनमताने बिल्डर माफियाच्या घशात घालण्याचा प्रयत्न सुरु असल्याबाबत सन २०२१*

1) *उपरोक्त विषयान्वये मा.लोक आयुक्त आणि लोकायुक्त महाराष्ट्र राज्य यांचेकडे माझ्याकडून केले तक्रारींच्या अनुषंगाने लोकआयुक्त कार्यालयाने भिवंडी मनपाकडे उक्त तक्रारीच्या अनुषंगाने अहवाल मागविलेबाबतचे पत्र क्र.उलोआ/कॉम/४३९/२०२० १२-७३१५/२०२१, दि.१५.०६.२०२१ रोजीचे पत्राची प्रत मिळावी.*
2) *लोकआयुंक्त यांचे पत्राच्या अनुषंगाने उप आयुक्त (अति.व अ.बा.) यांचेकडून वरील प्रकारचा अहवाल सादर करणेबाबत निर्गमित केलेले आदेश भिनिशमनपा/अन.बां.व अति.नि.वि./९०५/२०२१ दि.१४.०७.२०२१ च्या आदेशाची प्रत मिळावी.*
3) *उप आयुक्त (अति.व अ.बां.) यांचे आदेशान्वये सहा.आयुक्त क्र.५ यांचेकडून सादर करण्यात आलेल्या अहवालांची प्रत मिळावी.*
4) *उक्त प्रकरणाच्या अनुषंगाने लोकआयुक्त कार्यालयाकडे सादर करण्यात आलेल्या अहवालाची प्रत मिळावी."*

प्रस्तुत प्रकरणी आजच्या सुनावणीच्या वेळी तक्रारकर्ता यांनी असे निवेदन केले की, त्यांना अद्यापपर्यंत कोणतीही माहिती प्राप्त झालेली नाही. यासंदर्भात खुलासा करताना विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी असे निवेदन केले की, तक्रारकर्ता यांना दि.१६.०९.२०२१ रोजीच्या पत्रान्वये माहिती शुल्क भरणेबाबत कळविले होते. तथापि असे

पत्र प्राप्त झालेबाबत तक्रारकर्ता यांनी नकार दिला आहे. त्यांनी असे असे सांगितले की, प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दि.१७.११.२०२१ रोजी सुनावणी घेऊन, ०७ दिवसात तक्रारकर्ता यांना माहिती पुरविणेबाबत आदेश पारित केले आहेत. तथापि त्यानंतरसुध्दा अद्यापपर्यंत त्यांना माहिती मिळालेली नाही.

सदरची वस्तुस्थिती विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी मान्य केली आहे. तक्रारकर्ता यांना माहिती देण्यात आलेली नाही, हे स्पष्ट झाले आहे. तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी तक्रारकर्ता यांना विहित मुदतीमध्ये तसेच प्रथम अपिलीय प्राधिकारी यांच्या आदेशानंतरही माहिती दिलेली नाही. यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) अन्वये माहिती पुरविण्यासाठी झालेल्या विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा मागविणे आवश्यक आहे.

तसेच, आता विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी तक्रारकर्ता यांस त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागितलेली माहिती पुरविणे योग्य होईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहा.आयुक्त, प्रभाग समिती क्र.५, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका यांनी **तक्रारकर्ता यांना उपलब्ध माहिती हा आदेश मिळाल्यापासून १५ दिवसात समक्ष/ नोंदणीकृत टपालाने निःशुल्क पुरवावी.** जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.गिरीश घोष्टेकर, सहा.आयुक्त, प्रभाग समिती क्र.५, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका यांनी तक्रारकर्ता यांच्या दिनांक २६.०८.२०२१ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन विहीत मुदतीत तसेच प्रथम अपिलीय प्राधिकारी यांच्या आदेशानंतर देखील माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाच्या प्रतिदिन रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी पुढील सुनावणीच्या वेळी आयोगाकडे सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

३. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.०७.०५.२०२५ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.

(शेखर चन्ने)
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ०२ एप्रिल, २०२५ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**

तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.गिरीश घोष्टेकर, सहा.आयुक्त, प्रभाग समिती क्र.५, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, जुना एस.टी.स्टॅण्ड, कापआळी, ता.भिंवडी, जि.ठाणे ४२१ ३०२.

**- यांना प्रत**

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहा.आयुक्त,
प्रभाग समिती क्र.५, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका,
जुना एस.टी.स्टॅण्ड, कापआळी, ता.भिंवडी, जि.ठाणे ४२१ ३०२.

**यांचेमार्फत रवाना.**